जा.क्र.विकास/कार्यासन-३/विभागीय प्रदर्शन/कावि-०१/२५
विभागीय आयुक्त कार्यालय (विकास शाखा), पुणे विभाग, पुणे
विधान भवन, कौन्सिल हॉल, कॅम्प एरीया, पुणे ४११ ००१
ई-मेल : dcdpune1@gmail.com
दुरध्वनी क्र. (०२०)२६३६३०४०
दिनांक ०१-०१-२०२५

**प्रति,**

**जिल्हा अभियान संचालक**
**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष तथा,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली**

**विषय - सन २०२४-२५ चे विभागस्तरीय प्रदर्शनाचे आयोजना बाबत...**

संदर्भ - १.ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक : पणन-२००८/ प्र.क्र.७३८/योजना-१ दि.२७/०२/२००९.
२.जिल्हा अभियान सहसंचालक तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सांगली यांचेकडील पत्र दि.०५/१२/२०२४.

ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय दि.२७/०२/२००९ अन्वये राज्यात "स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजने" अंतर्गत विभागीय व जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन २०२४-२५ मधील पुणे विभागाचे विभागस्तरीय प्रदर्शन हे चक्राकार पध्दतीने सांगली जिल्ह्यामध्ये आयोजित करण्याचे निश्चित केलेले आहे.

सन २०२४-२५ मधील विभागस्तरीय व जिल्हास्तरीय प्रदर्शन दि.२५/०१/२०२५ ते ३०/०१/२०२५ कालावधीत आयोजन करणार असल्याचे संदर्भीय पत्र क्र.२ नुसार कळविलेले आहे. त्यानुसार सदर कालावधीत पुणे विभागाचे विभागस्तरीय प्रदर्शन सांगली जिल्ह्यामध्ये आयोजित करणेत यावे. तसेच सदरचे प्रदर्शन हे यशस्वी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करणेत येत असून समितीस प्रशासकीय, व्यवस्थापकीय व आर्थिक बाबींचे मंजूरीचे अधिकारास या आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | सदस्याचे पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. सांगली | अध्यक्ष |
| २ | उप आयुक्त (विकास), पुणे विभाग, पुणे | सदस्य |
| ३ | प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं., जि.प. सांगली | सदस्य सचिव |
| ४ | कार्यकारी अभियंता (बांधकाम-१), जि.प. सांगली | सदस्य |
| ५ | उप अभियंता, जि.ग्रा.वि.यं., जि.प. सांगली | सदस्य |
| ६ | सहा.प्रकल्प अधिकारी (संनियंत्रण), जि.ग्रा.वि.यं., जि.प. सांगली | सदस्य |
| ७ | लेखाधिकारी, जि.ग्रा.वि.यं., जि.प. सांगली | सदस्य |

तरी विभागीय प्रदर्शन यशस्वीपणे होण्यासाठी वरील समितीने सदर कार्यक्रमाचे व्यवस्थापन, प्रशासकीय, आर्थिक व इत्यादी बाबींची अंमलबजावणी ही शासन नियमानुसार करावी. तसेच या मध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार,** (भा.प्र.से.)
**विभागीय आयुक्त**
**पुणे विभाग, पुणे**